Inward No. 421 / 26.6.2012

**अत्यंत महत्वाचे**

**हस्तेबटवडा**

मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क/मा.स.शि/पदव्युत्तर/५२/२०१२

परिपत्रक :

विषय :- मागासवर्गीय विद्यार्थांसाठी भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क देण्याच्या योजने अंतर्गत आकारावयाचे शुल्क.

संदर्भ :- १) क्र/UG/३८५/२००९, दिनांक ६ ऑक्टोबर, २००९.
२) क/UG/३८६/२००९, दिनांक ६ ऑक्टोबर, २००९.
३) क्रा/PG/२५९/२०१०, दिनांक २० ऑगस्ट, २०१०.
४) क्र.वि.क.मा.स.शि./२३२/२०१०, दिनांक ९ ऑगस्ट, २०१०.

प्राचार्य / संचालक अशासकीय (अनुदानित व विना अनुदानित) कला, वाणिज्य व विज्ञान (अल्पसंख्यांक व बिगर अल्पसंख्याक) महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था तसेच संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाचे विविध विभाग व संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाने निर्गमित केलेल्या संदर्भ क्र.१, २ व ३ परिपत्रकान्वीये पदव्युत्तर पदवी, एम. फील व पी. एच. डी. (कला, वाणिज्य व विज्ञान) अभ्यासक्रमासाठी सुधारित शुल्क रचना शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून लागू केलेली आहे व तसे या कक्षाने वेळोवेळी परिपत्रके जारी केलेले आहेत.

विद्यापीठाने वर नमुद केलेल्या संदर्भ क्र. १, २ व ३ नुसार सर्व संचालक / विभाग प्रमुख, विद्यापीठाचे विविध पदव्युत्तर विभाग, संचालक दूर व मुक्त अध्ययन संस्था व प्राचार्य, संलग्नीत कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये जेथे पदव्युत्तर पदवी, एम.फील व पी.एच.डी. अभ्यासक्रम चालविले जातात त्यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, पदव्युत्तर पदवी, एम.फील व पी.एच.डी. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशावेळी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजने अंतर्गत शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्क जे महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागामार्फत विद्यापीठाच्या विभाग प्रमुखास / महाविद्यालयाच्या प्राचार्यास निश्चित केलेल्या शुल्काची प्रतीपूर्ती केली जाते. सदर शुल्क वगळून विद्यापीठाच्या विभाग प्रमुखांनी / महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून पदव्युत्तर पदवी एम.फील., पी.एच.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेशावेळी फक्त १) ॲडमिशन प्रोसेसिंग फी, २) डॉक्युमेंन्ट व्हेरीफीकेशन फी (लागु असल्यास ), ३) आय कार्ड शुल्क, ४) डिझास्टर रिलिफ फंड, ५) ग्रुप इन्शूरंन्स फी, ६) स्टुडंट वेलफेअर फंड, ७) व्हाईस चान्सलर फंड व ८) ई सुविधा या शिर्षकाचे शुल्क आकारण्यात यावेत व याव्यतीरीक्त इतर कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येऊ नये.

दिनांक : ३० मे, २०१२
स्थळ : मुंबई

(कुमार खैरे)

कुलसचिव

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी

१. संचालक / विभाग प्रमुख, विद्यापीठाचे विविध विभाग व संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था.
२. प्राचार्य / संचालक, अशासकीय (अनुदानित व विना अनुदानित) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये, (अल्पसंख्यांक व बिगर अल्पसंख्यांक महाविद्यालय)

प्रत माहितीसाठी

१. वित्त व लेखा अधिकारी.
२. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव /सह. कुलसचिव
३. परिक्षा नियंत्रक, महात्मा फुले भवन.
४. अभिलेखा विभाग (१० प्रति).
५. अध्यक्ष, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ, फोर्ट, मुंबई.
६. सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी, संघटना, विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई.
७. सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी संघटना, विद्यापीठ विद्यार्थी भवन, बी रोड, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०
८. अध्यक्ष, महाराष्ट्र अंडर प्रिव्हिलज्ड टिचर्स असोसिएशन, अ-१/२४, अनुपम नगर, मुरबाड रोड, कल्याण, जिल्हा - ठाणे.
९. सचिव, बॉम्बे युनिव्हर्सिटी ॲकॅडेमिक स्टाफ असोसिएशन, विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई.

(कुमार खैरे)

कुलसचिव